# Washim District Police

**Nature of Work** :- **Arresting Gangsters**

**Police Station** :- **Karanja Rural**

**Date of Good Work done** :- **29/08/2022**

**Brief of the work done :-**

वर्षभरात कत्तलीसाठी नेत असलेल्या 91 जनावरांची सुटका ; 13 गुन्ह्यांमध्ये 19 आरोपींवर प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये कारवाई.

लोकमत

# कत्तलीसाठी नेत असलेल्या ९१ जनावरांची सुटका

## वर्षभरात दाखल झाले १३ गुन्हे; जिल्ह्यात १९ आरोपींवर कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम :** प्राण्यांवरील अत्याचाराबाबत शासनाने निर्गमित केलेल्या अधिनियमांन्वये जिल्ह्यात महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ ची चोख अंमलबजावणी सुरू आहे. याअंतर्गत गेल्या वर्षभरात वाहनांद्वारे अवैधरीत्या कत्तलीसाठी जाणाऱ्या ९१ जनावरांची सुटका करण्यात आली. १३ गुन्ह्यांमध्ये १९ आरोपींवर कारवाई करून ५५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

जानेवारी २०२२ पासून आतापर्यंत गोमांस वाहतुकीसंदर्भात तीन; तर अवैध प्राणी वाहतूक संदर्भात प्राणी संरक्षण अधिनियम व क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम अन्वये १० असे एकूण १३ गुन्हे दाखल झाले. १९ आरोपींविरुद्ध कारवाई करून लाखोंचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. कारवायांमध्ये गोवंश जातीची ३०, ६० म्हशी आणि एका



### पोलीस स्टेशननिहाय दाखल गुन्हे

| | |
|---|---|
| वाशिम शहर | ०१ |
| मंगरूळपीर पो.स्टे. | ०२ |
| अनसिंग पो.स्टे | ०३ |
| आसेगाव पो.स्टे. | ०३ |
| कारंजा शहर | ०१ |
| कारंजा ग्रामीण | ०२ |
| मानोरा पो.स्टे. | ०१ |



### २६ ऑगस्टला झाली धडक कारवाई

२६ ऑगस्ट २०२२ रोजी कारंजा ग्रामीण पो.स्टे.च्या हद्दीत पोलीस निरीक्षक योगेश इंगळे हे पेट्रोलिंगवर असताना गुरांची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती त्यांनी मिळाली. कामरगाववरून येणाऱ्या बोलेरो पिकअप गाडीला खेर्डा चौकात अडवून तपासणी केली. वाहनात कोंबून भरलेल्या अवस्थेत ६ बैल आढळून आले. वाहनचालक अ.अजिब मो.कासम व सै. अह्फाज सै. अबरार यांना ६ लाख ९० हजारांच्या मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले. आरोपीवर कलम ११ (१), प्राण्यांना क्रूरपणे वागविण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० मधील सहकलम ५ (अ), महाराष्ट्र प्राणीरक्षण अधिनियम सहकलम १३०/१७७ मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यात आली.